नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १२५ Issue - 125 | वार - बुधवार दि. ३० सप्टेंबर २०२६ Blow- Wednesday Date 30 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## बँकांनी वसुलीसाठी शेतकऱ्यांकडे फिरकू नये, अधिकाऱ्यांनी मुख्यालयातच तळ ठोकावा, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : दुष्काळात शेतकऱ्यांच्या दारी बँक किंवा पतसंस्थेचा कोणताही कर्मचारी कर्जवसुलीसाठी जाता कामा नये, असे सक्त आदेश दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळाला सर्वात प्राधान्य दिले असून यापुढे, संपूर्ण शासकीय यंत्रणा व विशेषत: तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी अधिकाऱ्यांनी आपापल्या क्षेत्रात तळ ठोकून राहावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

बावनकुळे यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना सूचना केली की, कर्जवसुली थांबविण्याबाबत परिपत्रक रिझर्व बँक काढेल का? याबाबत विचारणा करावी. तसेच पतसंस्था, बँका यांनी पीक कर्जाच्या वसुलीबाबत शेतकऱ्यांच्या घराकडे जाता कामा नये. यासाठी जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांना सुचना देण्यात याव्यात.

मंत्रिमंडळ उपसमितीची महत्त्वपूर्ण बैठक आज मंत्रालयात मुख्य सचिव यांच्या दालनात पार पडली. राज्यातील टंचाई परिस्थितीचा सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला. बैठकीस ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री बावनकुळे म्हणाले, दुष्काळाच्या स्थितीत शेतकऱ्यांना सर्व प्रकारची मदत झाली पाहिजे. यासाठी प्रत्येक पंचनाम्यावर शेतकऱ्याची सही घेतली आहे. चाऱ्याची टंचाई, पाण्याची टंचाई आणि धरण तसेच तलावातील पाणीसाठी नियंत्रित ठेवण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. मोठ्या बांधकामांवर बंदी आणण्याबरोबरच सिमेंटचे रस्ते आणि पाण्याचा अपव्यय होईल अशी कामे टाळावी लागतील. जिल्हाधिकारी यांनी सीएसआर फंडाचा जास्तीत जास्त उपयोग दुष्काळ निवारणाच्या कामासाठी करावा अशा सुचनाही त्यांनी केल्या.

प्रधान सचिव विनिता वेद सिंघल यांनी राज्याच्या दुष्काळी परिस्थितीबाबत माहिती देताना सांगितले की, विभागीय आयुक्तांकडून प्राप्त माहितीनुसार राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये टंचाईची परिस्थिती समोर आली आहे. 'ट्रिगर-१' च्या निकषानुसार दुष्काळ स्थिती स्पष्ट झाली असून, 'ट्रिगर-२' लागू होणाऱ्या ४३ तालुक्यांसह इतर सर्व प्रभावित क्षेत्रांसाठी कागदोपत्री विलंबाची वाट न पाहता शासनाचा निर्णय (ऋठ) तातडीने जारी करावा, अशा सूचना देण्यात आल्या. सध्या पेरणी ९६ टक्के झाली असली तरी जमिनीवर पिकांची खरी परिस्थिती चिंताजनक आहे. वस्तुस्थितीदर्शक सर्व्हेक्षण करून येत्या २५ ऑक्टोबरपर्यंत अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्यात सध्या ५६० टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. चारा छावण्यांची मागणी सध्या जिल्हाधिकाऱ्यांकडून आलेली नसली तरी पारंपरिक छावण्यांऐवजी 'चारा डेपो' सुरू करण्याचा पर्याय चांगला असल्याचे पंकजा मुंडे आणि बाबासाहेब पाटील, गुलाबराव पाटील यांनी स्पष्ट केले. मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील यांनी राज्याचा चारा राज्याबाहेर जाणार नाही याची खबरदारी घेण्याचे निर्देश दिले.

ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी १० महिने पिण्याचे पाणी टिकवून ठेवण्याचे नियोजन मांडले. वाड्या-वस्त्यांवर लहान टँकर पाठवणे आणि स्थानिक पातळीवर अधिकाऱ्यांना टंचाई निधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.

चारा छावणी आणि पाण्याचे नियोजन समिती

चारा छावणीचा प्रारंभिक प्रस्ताव हा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात यावा. त्यासाठी जिल्हा परिषद सीईओ, कृषी विभाग आणि पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी यांची समिती करुन तो अंतिम करण्यात यावा. तसेच सचिव स्तरावरही त्यावर नियंत्रण करण्यात येईल. तसेच, चाऱ्यावर देशातील अन्य राज्यांत करण्यात येणाऱ्या उपाययोजना तपासून महाराष्ट्रासाठी एक चांगली चारा योजना तयार करावी. यासाठी तीन विभागांच्या सचिवांची समिती मुख्य सचिवानी नेमावी असे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

# दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची दहावी बारावी बोर्ड परीक्षेची फी माफ

## राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सर्व विभागीय मंडळांना दिल्या सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यातील दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमधील विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून पुढील आदेश येईपर्यंत परीक्षा शुल्क न घेता ऑनलाईन आवेदनपत्रे भरून घेण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सर्व विभागीय मंडळांना दिल्या आहेत. मदत व पुनर्वसन विभागाच्या २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने विशेष बाब म्हणून विविध सवलती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीचाही समावेश आहे. या पार्श्वभूमीवर राज्य मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या परीक्षांसाठी दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क न घेता आवेदनपत्रे भरून घेण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. याबाबतच्या पुढील सविस्तर सूचना राज्य मंडळाकडून स्वतंत्रपणे जारी करण्यात येणार असून सर्व विभागीय मंडळांनी आपल्या कार्यक्षेत्रातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना तात्काळ सूचना देण्यास सांगितले आहे. तसेच करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळाकडे तातडीने सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

## भारतीय मुलींची मोठी कामगिरी! आशियाई क्रीडा स्पर्धेत सहावे सुवर्णपदक, पदक तालिकेत मिळालं मानाचं पान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय महिलांना उल्लेखनिय कामगिरी केली आहे. महिलांच्या ४ ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक जिंकले आहे. २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताचे हे सहावे सुवर्णपदक होते. सुवर्णपदक विजेत्या भारतीय संघात किरण, मचेत्तिरा पूवम्मा, प्राची आणि विथ्या रामराज यांचा समावेश होता. भारतीय संघाने ही शर्यत ३:२९.६९ मिनिटांत पूर्ण केली.

बहरीन संघाने या स्पर्धेत दुसरे स्थान पटकावून रौप्यपदक जिंकले

बहरीन संघाने या स्पर्धेत दुसरे स्थान पटकावून रौप्यपदक जिंकले. बहरीनच्या खेळाडूंनी ३:३०.२१ मिनिटांत शर्यत पूर्ण केली. भारत आणि बहरीन यांच्या वेळेत ०.५२ सेकंदांचे अंतर होते. चीन संघाने तिसरे स्थान पटकावून कांस्यपदक मिळवले. चीनच्या खेळाडूंनी ३:३१.०२ मिनिटांत शर्यत पूर्ण केली. दरम्यान, भारताने आशियाई क्रीडा स्पर्धेत उत्तम कामगिरी केली आहे. यामध्ये भारतीय महिलांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे. भारताला एकूण ६ सुवर्णपदक आत्तापर्यंत मिळाले आहेत.

भारताने क्रिकेट, कबड्डी आणि नेमबाजीमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. आता थलेटिक्समध्येही सुवर्णपदकाची भर पडली आहे. यासह भारताने पदक तालिकेत ५० चा आकडा पार केला आहे.

धावपटू वित्या रामराजचे आशियाई क्रीडा स्पर्धेतील हे दुसरे पदक होते. यापूर्वी तिने ४०० मीटर अडथळा शर्यतीत कांस्यपदक जिंकले होते. आता तिने सुवर्णपदकही पटकावले आहे. स्पर्धेदरम्यान पाऊस पडत होता, तरीही भारतीय खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. पावसामुळे त्यांना कोणताही अडथळा आला नाही. अनेकदा पावसात धावताना खेळाडूंना अडचणी येतात.

सहाव्या सुवर्णपदकासह भारताने पदक तालिकेत १० वे स्थान पटकावले आहे. एकूण पदकांची संख्या ५१ झाली आहे. यामध्ये ६ सुवर्ण, २१ रौप्य आणि २४ कांस्य पदकांचा समावेश आहे.

## निकषांत न बसणाऱ्या तालुक्यांनाही मिळणार मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती आणि टंचाईवर मात करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. तांत्रिक निकषांमुळे कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी विशेष बाब म्हणून ज्या तालुक्यांचे पीक करपले आहे, मात्र ते निकषात बसत नाहीत, तिथे प्रत्यक्ष जमीन पाहणी करून त्यांना दुष्काळाचे सर्व फायदे देणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमिती बैठक नियमित घ्या, मंत्र्यांनी आपल्या सूचना नियमितपणे या उपसमितीकडे द्याव्या. जे तालुके समाविष्ट झालेले नाहीत, त्याबाबत अन्य निकष लावून मदतीबाबत प्रस्ताव सादर करावा पाणीवापर कसा करायचा याचा स्वयंस्पष्ट ऋठ काढा, पिण्याचे पाणी गृहीत धरताना त्यात जनावरांचे पाणी समाविष्ट करा आणि नंतर इतर प्राधान्यक्रम ठरवा डीपीडीसीमध्ये अधिकाधिक कामे ही दुष्काळ निवारणाची घ्या! पालकमंत्र्यांनी कल्पकतेने स्थानिक स्तरावर काय निर्णय घेता येईल, यावर लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांचे दहावी-बारावी परीक्षा शुल्क घेऊन रिफंड करण्यापेक्षा आधीच घेऊ नका. तांत्रिकी अडचणींमुळे शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही'

### अक्कलकोट दक्षिण पोलिसांची धडक कारवाई

### २४० गांजाची झाडे आढळली; २११ किलो १०० ग्रॅम वजनाचा मुद्देमाल जप्त

# आळगी येथील ऊसाच्या शेतातून १ कोटी ०५ लाख ५५ हजार रुपयांचा गांजा जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/विशेष प्रतिनिधी







अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहिमेंतर्गत मोठी कारवाई करत मौजे आळगी, ता. अक्कलकोट येथील एका शेतकऱ्याच्या ऊसाच्या शेतातून तब्बल १ कोटी ०५ लाख ५५ हजार रुपये किंमतीचा गांजा जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांना एकूण २४० गांजाची झाडे आढळून आली असून त्यापैकी २१० जिवंत गांजाची झाडे तर ३० वाळलेली गांजाची झाडे असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यात अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहीम राबवून प्रभावी कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक श्री. अतुल कुलकर्णी (भा.पो.से.) आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. विजय कबाडे यांनी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. विनोद घुगे यांनी सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत बधे यांचे विशेष पथक नेमून कारवाईचे आदेश दिले.

गोपनीय माहितीवरून कारवाई

दिनांक २८ सप्टेंबर २०२६ रोजी सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत बधे व त्यांचे पथक अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील करजगी दूरक्षेत्र येथे पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी गोपनीय बातमीदारामार्फत मौजे आळगी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील एका शेतकऱ्याने आपल्या ऊसाच्या शेतातील पिकामध्ये गांजा सदृश्य वनस्पतीची लागवड केल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली.

मिळालेली माहिती पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, अक्कलकोट विभाग, अक्कलकोट श्री. राजेंद्र टाकणे यांना कळविली. त्यांच्या मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक विनोद घुगे, सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत बधे आणि त्यांच्या पथकाने संबंधित शेतात जाऊन पाहणी केली.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची अंदाजे किंमत १ कोटी ०५ लाख ५५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

अंमली पदार्थ कायद्यानुसार गुन्हा दाखल

या प्रकरणी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५३१/२०२६ दाखल करण्यात आला असून अंमली पदार्थ व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत बधे करीत आहेत.

अक्कलकोट दक्षिण पोलिसांच्या या कारवाईमुळे ऊसाच्या शेतामध्ये गांजाची लागवड केल्याचे प्रकरण उघडकीस आले असून, अंमली पदार्थ विरोधी मोहिमेअंतर्गत पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर मुद्देमाल जप्त केला आहे.

### ऊसाच्या शेतात १२ फूट उंचीची गांजाची झाडे

**पोलिसांनी आरोपी मलप्पा गुरुबाळप्पा गड्डी उर्फ बिराजदार (वय ६० वर्षे, रा. शेगाव, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर) यांच्या ऊसाच्या शेताची पाहणी केली असता ऊसाच्या पिकामध्ये ठिकठिकाणी अंदाजे १२ फूट उंचीची गांजा सदृश्य मोठी झाडे लावण्यात आल्याचे निदर्शनास आले. पंचनाम्याअंतर्गत ही झाडे जप्त करण्यात आली. पोलिसांना एकूण २४० गांजाची झाडे मिळून आली. त्यापैकी २१० झाडे जिवंत तर ३० झाडे वाळलेली होती. जप्त केलेल्या गांजा सदृश्य वनस्पतीचे वजन केले असता ते २११ किलो १०० ग्रॅम इतके भरले.**

### वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

**ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र टाकणे, अक्कलकोट विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत बधे, पोलीस उपनिरीक्षक राजशेखर निंबाळे तसेच पोलीस हवालदार मोसलगी, चिंचोळकर, कोळी, धुमाळ, डोंगरीतोट, हडपद, धनगर, कोळी, सूर्यवंशी, पाटील, बिराजदार, अन्सारी, शिंदे, पवार, डोंगरीतोट, माने आणि पोलीस नाईक कोले यांनी ही कारवाई पार पाडली.**

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### महसूलमंत्र्यांचे आदेश

दुष्काळात शेतकऱ्यांच्या दारी बँक किंवा पतसंस्थेचा कोणताही कर्मचारी कर्जवसुलीसाठी जाता कामा नये, असे सक्त आदेश दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळाला सर्वात प्राधान्य दिले असून यापुढे, संपूर्ण शासकीय यंत्रणा व विशेषतः तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी अधिकाऱ्यांनी आपापल्या क्षेत्रात तळ ठोकून राहावे. बावनकुळे यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना सूचना केली की, कर्जवसुली थांबविण्याबाबत परिपत्रक रिझर्व बँक काढेल का? याबाबत विचारणा करावी. तसेच पतसंस्था, बँका यांनी पीक कर्जाच्या वसुलीबाबत शेतकऱ्यांच्या घराकडे जाता कामा नये. यासाठी जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांना सुचना देण्यात याव्यात. मंत्रिमंडळ उपसमितीची महत्त्वपूर्ण बैठक आज मंत्रालयात मुख्य सचिव यांच्या दालनात पार पडली. राज्यातील टंचाई परिस्थितीचा सविस्तर आढावा या बैठकीत घेण्यात आला. दुष्काळाच्या स्थितीत शेतकऱ्यांना सर्व प्रकारची मदत झाली पाहिजे. यासाठी प्रत्येक पंचनाम्यावर शेतकऱ्याची सही घेतली आहे. चाऱ्याची टंचाई, पाण्याची टंचाई आणि धरण तसेच तलावातील पाणीसाठी नियंत्रित ठेवण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. मोठ्या बांधकामांवर बंदी आणण्याबरोबरच सिमेंटचे रस्ते आणि पाण्याचा अपव्यय होईल अशी कामे टाळावी लागतील. जिल्हाधिकारी यांनी सीएसआर फंडाचा जास्तीत जास्त उपयोग दुष्काळ निवारणाच्या कामासाठी करावा. विभागीय आयुक्तांकडून प्राप्त माहितीनुसार राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये टंचाईची परिस्थिती समोर आली आहे. 'ट्रिगर-१' च्या निकषानुसार दुष्काळ स्थिती स्पष्ट झाली असून, 'ट्रिगर-२' लागू होणाऱ्या ४३ तालुक्यांसह इतर सर्व प्रभावित क्षेत्रांसाठी कागदोपत्री विलंबाची वाट न पाहता शासनाचा निर्णय तातडीने जारी करावा, अशा सूचना देण्यात आल्या.

# आजऱ्यात स्वेरीच्या डॉ.बी.पी. रोंगे सरांना निवडून देण्याचा निर्धार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**ज्ञानयात्री डॉ. रोंगे सरांनी साधला शिक्षकांबरोबर संवाद**



सातारा– राज्यातील शिक्षक मतदार संघाची निवडणूक प्रक्रिया महिन्यावर येऊन ठेपली असून पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तंत्रशिक्षणातील विविध यशस्वी उपक्रमामुळे राज्यात ज्ञानयात्री म्हणून ओळख झालेले स्वेरीचे डॉ. बी. पी. रोंगे सर यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील शिक्षकांशी थेट संवाद साधला. त्यावेळी तालुक्यातील शिक्षकांनी सरांना आमदार म्हणून पाहण्याचे ठरविले आहे, असे लक्षात येत आहे कारण डॉ.रोंगे सरांच्या भेटीला जत्रेचे स्वरूप लाभत आहे. स्वेरीतील विद्यार्थ्यांच्या करिअर प्रमाणे या तालुक्यात ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांचे देखील भविष्य उज्वल झाले पाहिजे या भावनेतून शिक्षक उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत.

निवडणूक जसजशी जवळ येत आहे तसतशी डॉ. रोंगे सरांसोबत शिक्षकांच्या गर्दीत भर पडत आहे. गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी अर्थात श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटचे संस्थापक, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य व खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे हे शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत असल्याचे पहायला मिळत आहे. डॉ.रोंगे सर हे गेल्या वर्षाच्या ऑक्टोबर महीन्यापासून पुणे विभाग मतदार संघातील सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे व सोलापूर या पाचही जिल्ह्यांतील शाळा व कॉलेज मधील पदाधिकारी व शिक्षकांना भेट देऊन परिसर पिंजून काढत आहेत आणि शिक्षकांच्या समस्या जाणून घेत आहेत. या निमित्ताने आजरा तालुक्यात सर्वत्र डॉ. रोंगे सरांचे स्वागत केले जात आहे. या अनुषंगाने प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी शिक्षकांच्या प्रत्यक्ष भेटीच्या रूपाने प्रचारात आघाडी घेतली आहे हे स्पष्ट होते. स्वेरीच्या स्थापनेपासून डॉ. बी.पी.रोंगे सरांची मुद्देसूद आणि व्यवस्थित मांडणी, प्रत्येक समस्येचा सुक्ष्म अभ्यास या धोरणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या तंत्रशुद्ध अभ्यासाचा आता राज्याला फायदा होणार आहे. डॉ. रोंगे सरांना पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांतील शिक्षकांचा भक्कम प्रतिसाद लाभत आहे. मतदार नोंदणीपासून निवडणूकीच्या सर्व प्रक्रियाबाबत डॉ. रोंगे सर प्रत्येक शाळेत, प्रत्येक शिक्षकांना, संस्थाचालकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भेट घेवून चर्चा करत आहेत. सरांच्या या चर्चांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये अनेक शिक्षक संघटनांनी व पदाधिकाऱ्यांनी डॉ. रोंगे सरांना पाठिंबा दर्शविला आहे. या भेटीमध्ये सर्व शाळांमध्ये प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक वर्ग शिक्षकेतर कर्मचारी डॉ. रोंगे सरांचे कमालीचे स्वागत करत आहेत. मागील उमेदवारांच्या कामगिरीपेक्षा डॉ.रोंगे यांचेकडून शिक्षकांना अभ्यासपूर्ण कार्याची अपेक्षा आहे. त्यामुळे डॉ. रोंगे सरांच्या या प्रक्रियेतील सहभागामुळे शिक्षकांचा उत्साह वाढला आहे. एकूणच डॉ.रोंगे सर यांच्या स्वेरी, एसव्हीआयटी आणि स्वाईप या तिन्ही संस्थांना अल्पावधित मिळालेल्या यशामुळे शिक्षकांची अपेक्षा वाढली आहे. निवडणुकीच्या निमित्ताने कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील जवळपास ३० शाळा महाविद्यालयांना भेटी देऊन डॉ. रोंगे सरांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी यावेळी पंडित दीनदयाळ विद्यालय आजरा, आजरा महाविद्यालय आजरा, आजरा हायस्कूल आजरा, व्यंकटराव हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज आजरा, डॉ. झाकीर हुसेन उर्दू हायस्कूल आजरा, व्यंकटराव कला वाणिज्य व सायन्स महाविद्यालय आजरा यासह इतर शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन तेथील समस्या जाणून घेतल्या. वास्तविक पाहता आमदार होण्यापूर्वीच डॉ. रोंगे सरांनी सोलापूर जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाळांमधील एकूण २७ मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या पदोन्नतीनंतर तब्बल आठ महिन्यांपासून प्रलंबित असलेला पदमान्यता व वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी लावला आहे. त्याचबरोबर सोलापूर जिल्हा सेवा अभियानांतर्गत प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे निर्देश भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिले होते. त्या अनुषंगाने त्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी संतोष साखरे यांच्या माध्यमातून प्राचार्य डॉ. बब्रुवाहन रोंगे यांच्या पाठपुराव्याला यश आले असून शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदोन्नती, नियुक्ती व सेवा विषयक एकूण ३७ प्रकरणे सोडवली गेली आहेत. त्यामुळे संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय मिळाला आहे. या प्रकरणांच्या अनुषंगाने शिक्षण विभागाने कार्यवाही करत एकाच दिवसात ३७ प्रकरणांची सोडवणूक करून न्याय दिला आहे. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. या कारणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या भेटींचे सर्वत्र स्वागत होत आहे. या भेटी दरम्यान बोलताना डॉ.बी.पी. रोंगे सर म्हणाले की 'आज शिक्षकांसमोर अनेक प्रश्न, अडचणी व समस्या आहेत. त्या सर्व शासन पातळीवर अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडण्यासाठी मी कटिबद्ध आहे. टीईटी, जुनी पेन्शन योजना अशा अनेक समस्या आहेत, त्यांचा मी बारकाईने अभ्यास केला आहे. खरे पाहता हे प्रश्न फार पूर्वी सुटायला हवे होते परंतु उदासीनतेमुळे ते सुटलेले नाहीत. यासाठी जर आपण सेवा करण्याची संधी दिली तर जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्न करून अनुत्तरीत प्रश्न सोडविण्यासाठी कोठेही कमी पडणार नाही.' अशी ग्वाही डॉ. रोंगे सरांनी दिली. आमदार होण्यापूर्वीच त्यांनी काही प्रश्न सोडविले आहेत त्यामुळे डॉ. रोंगे सरांकडे आजरा तालुक्यातील शिक्षक आशेने पाहत आहेत, हे मात्र नक्की जाणवते.

# कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगाम २०२६-२७ चा मोळी पूजन समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी/पंढरपूर

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगाम २०२६-२७ चा मोळी पूजन समारंभ कारखान्याचे चेअरमन मा.आ.श्री. प्रशांतराव परिचारक (मालक) यांच्या शुभहस्ते नुकताच संपन्न झाला. यावेळी ऊस मोळीचे पूजन कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन मा.श्री. बाळासाहेब सालविठ्ठल यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी कारखान्याचे व्हा. चेअरमन मा श्री कैलासराव खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी साहेब व सर्व संचालक व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी कारखान्याचे चेअरमन मा.आ.श्री. प्रशांतराव परिचारक (मालक) यांनी सांगितले की, गळीत हंगाम २०२६- २७ सुरू करण्याचे दृष्टीने कारखान्याची संपूर्ण तयारी झाली आहे. यावर्षी कारखान्याने ऊस गाळपाचे ९ लाख मे टन उद्दिष्ट ठेवले असून १० लाख क्विंटल साखर उत्पादित केली जाईल. या वर्षी पावसाचे प्रमाण खुपच कमी असल्याने ऊसाची वाढ झालेली नाही. त्यामुळे सर्वच कारखान्याच्या टनेजमध्ये घट होऊ शकते. आपले कारखान्याचे गाळपाचे उद्दीष्ट पूर्ण करणेसाठी सर्व ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांनी त्यांचा ऊस कारखान्यास गाळपास देवून सहकार्य करणेचे अहवान करण्यात आले.

यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी साहेब यांनी माहिती दिली की, कारखाना को-जनरेशन प्रकल्प, आसवनी प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालवले जाणार आहेत. यासाठी आवश्यक असणारी सर्व कामे पूर्ण झाली आहेत. कारखाना पूर्ण कार्यक्षमतेने चालवणेसाठी आवश्यक असणारी ऊस तोडणी वाहतूक यंत्रणेची उभारणी कारखान्याने केली असून, त्याचप्रमाणे कार्यक्षेत्रात ऊस तोडणीसाठी ऊस तोडणी मजूर व वाहने येण्यास सुरुवात झाली आहे. चालु वर्षीही कारखाना तोडणी यंत्राचाही ऊस तोडणीसाठी वापर करणार असुन कारखान्याने स्वतःच्या मालकीची तोडणी वाहतूक यंत्रे विकत घेतली आहेत. याशिवाय इतर तोडणी यंत्रे धारकाबरोबरही करार केलेले आहेत ही सर्व तोडणी यंत्रे या हंगामात कारखान्यास उसाचा पुरवठा करणार आहेत.




यावेळी कारखान्याचे व्हा. चेअरमन मा.श्री. कैलास खुळे, जेष्ठ संचालक श्री. दिनकरराव मोरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मा.श्री. हरिषदादा गायकवाड, अर्बन बँकचे चेअरमन मा.श्री. सतिश मुळे, पंचायत समितीचे सभापती मा.श्री. शुभम आगवणे, श्री. दिलीपराव चव्हाण, श्री उमेशराव परिचारक, श्री. ज्ञानदेव ढोबळे, श्री.तानाजी वाघमोडे, श्री. बाळासाहेब यलमर, श्री. भगवान चौगुले, श्री. लक्ष्मण धनवडे श्री. भास्कर कसगावडे, श्री. भैरू वाघमारे, श्री. गंगाराम विभुते, श्री. सुदाम मोरे, श्री. विजय जाधव, श्री. हनुमंत कदम, श्री. किसन सरवदे, श्री. दाजी पाटील, श्री. दिलीप गुरव, श्री. शामराव साळुंखे, श्री. राणू पाटील त्याचप्रमाणे विविध संस्थेचे पदाधिकारी आणि कारखान्याचे अधिकारी उपस्थित होते.

# कळंब तालुका जोशाबा बहुजन शिक्षक सहकारी पतसंस्थेची २१ वी सर्वसाधारण सभा चेअरमन सचिन ताकपिरे सर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क.**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : दि. २७/०९/२०२६ रोजी जोशाबा बहुजन शिक्षक सहकारी पतसंस्थेची २१ वी सर्वसाधारण सभा चेअरमन सन्माननीय सचिन ताकपिरे सर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात पार पडली .

या सभेस विचार मंचावर लातूरचे उपशिक्षणाधिकारी सन्मा.मधुकरजी तोडकर साहेब ,ढोकी पोलीस स्टेशनचे पीएसआय सन्मा. किशोरजी माळी साहेब , शिक्षण विस्तार अधिकारी संतोषजी माळी साहेब , संस्थापक अध्यक्ष तथा माजी केंद्रप्रमुख सन्मा. जाकते साहेब , संस्थापक सचिव तथा माजी केंद्रप्रमुख सन्मा. एल. आर. धावारे साहेब पतसंस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक सन्मा.सी . आर .घाडगे साहेब, व्हा . चेअरमन शांतीलाल चव्हाण सर,सचिव महेंद्र रणदिवे सर, सहसचिव सचिन भांडे सर हे होते .

त्याचप्रमाने सर्व संचालक मंडळ, मोठ्या संख्येने सभासद बंधू , गुणवंत विद्यार्थी, शिक्षकरत्न सत्कार मूर्ती, आआपतेष्ट आणि इतर मान्यवर उपस्थित होते . सभेचे प्रास्ताविक विद्यमान चेअरमन सचिन ताकपिरे सर यांनी दमदार करून पतसंस्थेचे धोरणात्मक निर्णय कार्यपद्धती यावर विविध प्रकारचे उदा .दाखले देवून मंत्रमुग्ध केले .

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित गुणगौरव सत्कार करण्यात आला .त्यानंतर जोशाबा शिक्षकरत्न पुरस्काराने शिक्षक बांधवांना गौरवण्यात आले ,जोशाबा शिक्षकरत्न पुरस्कार

१. आयु . संतोष छबूबाई रोहिदास गायकवाड (स.शि) जिल्हा प. प्रा. शाळा कोथळा ता. कळंब

२. आयु .सुनिता लक्ष्मी मधुकर पोतदार(प्रा.प.) पी. एम, श्री. जिल्हा परिषद कन्या कळंब तालुका कळंब

३.आयु .राजेंद्र पद्मिनी दामोदर अंगरखे(स. शि.) जि. प. के. प्रा. शश्र. सारोळा बुद्रूक ता. धारशिब

४. आयु .संघरत्न जानकी फकीरचंद कसबे (मु.अ.) जिल्हा प. के.. प्रा शाळा गौर ता. कळंब

५. आयु .कडप्पा चांगुणाबाई संभाजी आल्टे (स. शि) जिल्हा प. प्रा शाळा... गिरीवस्ती वडगाव (शि)

६. आयु .राजकुमार स्वार्थाबाई केरबा सुरवसे मा उपाध्यक्ष जि प पा शाळा भिकार सारोळा ता धाराशिव

७. आयु .भास्कर कांबळे सर जि . प. प्रा शा . लोहटा पश्चिम विशेष सत्कार

जोशाबा परिवारासाठी अहोरात्र भरीव कामगिरी केल्याबद्दल आणि सेवा निवृत्ती बद्दल समर्पित व्यक्ती विशेष सत्कार मानपत्र देवून करण्यात आला

१) आद . आयु .जाकते जगदीश आण्णा २) आद . आयु .धावारे लक्ष्मण धम्म सारथी



तसेच सेवानिवृती बद्दल शैक्षणिक योगदाना बद्दल खालील प्रमाणे सत्कार करण्यात आला .

१) आद . आयु .कांबळे कैलास सर २) आद . आयु .उबाळे सर .

त्यानंतर सर्व मान्यवरांचे प्रेरणादायी मार्गदर्शन लाभले . सर्वच मान्यवरांनी आपल्या वाणीतून अनुभव कथन करून विद्यार्थ्यांना भविष्यात यशस्वी होण्याचा कानमंत्र दिला .

नव्याने नोकरीला लागलेले किशोरजी माळी साहेबांनी त्यांच्या वाणीतून विद्यार्थ्यांना जीवन संघर्षाची प्रेरणादायी कहाणी सांगून यशस्वी होण्यासाठी जिद्द, चिकाटी, अविरत मेहनत यामुळे व्यक्ती ४५% वरून कसा वर्दीत येतो हे त्यांनी त्यांच्या दर्दी शैलीत सांगितले . त्यापुढे त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश दिला की, सोशल जीवनात यशस्वी होण्यासाठी सध्या सोशल मिडिया पासून दूर राहिले पाहिजे म्हणजेच चेल. पासून पालकांनी पाल्याला दूर ठेवायला हवे. हे त्यांचे हृदयस्पर्शी ाशिशलह होते

**संकल्प नव वास्तू उभारणीचा**

सभेच्या अध्यक्षीय प्रास्तविकात चेअरमन सचिन ताकपिरे सरांनी गतवर्षी खरेदी केलेल्या १४०ाेर्षिं प्लॉट मध्ये इमारत बांधणीचा मनोदय व्यक्त केला . त्यांनी संकल्प केला की , पुढील आर्थिक वर्षातील ऋइ ही आपल्या हक्काच्या इमारतीत झाली पाहिजे . यासाठी स्वतःपासून सुरुवात करून उहरीळीं इशसळपी क्रेश .याप्रमाणे त्यांनी स्मृतीशेष आजी त्रिवेणी चंद्रभान ताकपिरे यांच्या पुण्यतिथीचा अवांतर खर्च टाळून त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ नव्या होणाऱ्या वास्तूसाठी ५०,००० देणगी देण्याचे जाहीर केले . त्यांनी उपस्थित सर्व सभासदांना आव्हान केले की इमारत बांधणीसाठी तुमचे मत काय आहे? यावर उपस्थित सर्व सभासदांनी हात वर करून नवीन वास्तू निर्मितीस संमती दर्शविली . कोणाला नको आहे स्वतःची वास्तू? सर्वांची आंतरिक इच्छा तीच आहे की आपली सुद्धा हक्काची पतसंस्थेची भव्य इमारत व्हायलाच पाहिजे .

तसेच संस्थेचे विद्यमान सचिव महेंद्र रणदिवे सरांनी ही अहवाल वाचन झाल्यांनंतर इमारत निधीतून कायदेशीर रित्या वास्तूची कोनशिला रोवण्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्याचे आवाहन केले . त्यांनी सकारात्मकता दर्शविली=च=ज .

सर्वात महत्त्वाचे म्हणजे जाकते आण्णा यांनी गेली वीस वर्षे सभेत स्टेजवर न बोलता ही अगदी कृतीतून सर्व नियोजनबद्ध काम करणारे आण्णा यांनी आज मनाशी खुणगाठ बांधून गेली २१ वर्षाचा तोफगोळा बाहेर काढून सर्वच पतसंस्थेचा संघर्षमय इतिहास कार्यशैली यावर प्रकाशझोत टाकला . ऐकणाऱ्यास वाटत होते आण्णांनी आज खूप बोलावे आणि आम्ही ऐकावे . आण्णा संस्थापक अध्यक्षास शोभावे असेच बोलले . आण्णा हळव्या मनातून अश्रू ढाळून तर कधी हास्य फुलवून सभागृहास मंत्रमुग्ध करत होते .

शेवटी आण्णा कसे मागे राहणार त्यांनी सेवेतून निवृत्त होऊनही इमारत बांधणीस तब्बल १००००० ₹देणगी जाहीर केली आणि सर्व सभासदांनाही आपल्या हक्काच्या इमारतीसाठी आपल्या मर्जीप्रमाणे देणगी देण्याचे आव्हानही केले . आधी केले मग सांगितले

त्यानंतर संस्थापक सचिव माजी केंद्रप्रमुख आणि सध्या भारतीय बौद्धमहासभेच्या माध्यमातून कार्यातून धम्मदीप तेवत ठेवणारे ङ.ठ. धावारे साहेब यांनीही त्यांच्या नेहमीच्या मिश्किल वाणीतून सर्वांना महापुरुषाचे विचार सांगून मैत्रीय भावना वाढीस लावून पतसंस्था कशी प्रगती शिखरावर पोहचेल यासाठी त्यांनी मंगल कामना केली .

इमारतीसाठी त्यांनी तूर्तास जरी कोणतीही देणगी जाहीर नसली केली तरी त्यांची आंतरिक तळमळ भव्य दिव्य इमारत व्हावी अशीच आहे . त्यासाठी ते आपणा सर्वांना प्रत्यक्षपणे देणगीच्या बाबतीतआश्चर्याचा धक्का देतील असे वाटते.=च=ज

शेवटी आभाराच्या रसमलाईतून व्हा .चेअरमन यांनी अगदी प्रस्थापित कवींना पाणी पाजावे तसे जाकते आण्णा आणि ङ.ठ धावारे सर यांच्या सेवा निवृत्तीवर अगदी २१ वर्षाचा पतसंस्थेचा कार्यकाल, शिक्षक ते केंद्रप्रमुख कार्यशैलीचा सर्व लेखाजोखा अवघ्या५ मिनीटात कवनाने सर्वांना मंत्रमुग्ध करून मांडला . तसेच त्यांनीही व्हा .चेअरमन पदाला साजेल असा मनोदय व्यक्त केला मिळणारा सर्वच लाभांस २१०००रु + वरून४०००₹ =२५००० ₹ नविन वास्तूस देणगी जाहीर केली . देणाऱ्याने देत जावे देता देता ... याप्रमाणे त्यांनीही सर्वांना इमारत देणगी देण्याचे आव्हान केले .

शेवटी सर्वांचे भरभरून आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सुरुची भोजनाने आणि लाभांशाच्या ह्रीळलरश्रश्रू नोटाने तिहेरी मेजवानीने सांगता झाली . कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन विशाल वाघमारे सर आणि सचिन भांडे सर यांनी केले तर आभार शांतीलाल चव्हाण यांनी मानले .

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व संचालक मंडळ, विलासदावणे सर, विष्णू पाळवदे सर, विकास घाड यूगे सर, सचिन भांडे सर, अर्जून जाधव सर, चव्हाण सर आदिनीं परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# विंचूरमध्ये मोठ्या पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण हटाव मोहीम

## संभाजीनगर - नाशिक रस्त्याने घेतला मोकळा श्वास; कारवाईदरम्यान व्यावसायिकाने विष प्राशन केल्याने खळबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : विंचूर शहरातील संभाजीनगर - नाशिक रस्त्यासह तीनपाटी आणि बसस्थानक परिसरातील रस्त्याच्या कडेला व फूटपाथवर करण्यात आलेले अतिक्रमण हटविण्यासाठी प्रशासनाने आज सोमवार दि.२८ सप्टेंबर रोजी मोठी मोहीम राबविली. मोठ्या पोलीस बंदोबस्तात झालेल्या या कारवाईमुळे रस्त्यावरील अतिक्रमणे हटवून वाहतुकीसाठी मार्ग मोकळा करण्यात आला. मात्र, या कारवाईदरम्यान एका व्यावसायिकाने विष प्राशन केल्याची घटना घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.





रस्त्याच्या हद्दीत वाढलेली अतिक्रमणे आणि फूटपाथवर उभारण्यात आलेल्या दुकानांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. याची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेण्यात आली. कारवाई सुरू होताच अनेक व्यावसायिकांनी स्वतःहून पत्रे, अँगल, शेड व इतर साहित्य हटविण्यास सुरुवात केली.

प्रशासनाच्या पथकाने रस्त्याच्या हद्दीतील अतिक्रमणे हटवून फूटपाथही मोकळे केले. त्यामुळे संभाजीनगर - नाशिक रस्त्याने काही काळानंतर मोकळा श्वास घेतल्याचे चित्र पाहायला मिळाले. अतिक्रमण हटविल्याने वाहतुकीची कोंडी कमी होण्यास मदत होणार असून पादचाऱ्यांसाठीही फूटपाथ उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, कारवाईच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. निफाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी कांतीलाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वावी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कोते, पोलीस उपनिरीक्षक किरण साळुंखे यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी बंदोबस्तासाठी उपस्थित होते.

**सलून दुकानावरील कारवाईनंतर व्यावसायिकाने विष प्राशन केले**

पोलीस चौकीसमोरील सलून दुकानावरही अतिक्रमण हटाव कारवाई करण्यात आली. दुकान हटविल्यानंतर पंडित साळुंखे या व्यावसायिकाने विष प्राशन केल्याची घटना घडली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

**अतिक्रमणाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याची गरज**

रस्ता आणि फूटपाथ नागरिकांसाठी मोकळे ठेवणे आवश्यक असले, तरी अनेक वर्षांपासून याच ठिकाणी व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या छोट्या व्यावसायिकांच्या प्रश्नाकडेही प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त होत आहे. अतिक्रमण हटविताना संबंधित व्यावसायिकांना पूर्वसूचना, कायदेशीर प्रक्रिया, उपलब्ध पर्यायी जागा तसेच पुनर्व्यवस्थेबाबत मार्गदर्शन मिळणे आवश्यक असल्याची भावना व्यावसायिकांकडून व्यक्त होत आहे. त्यामुळे रस्ता मोकळा करण्याबरोबरच प्रभावित व्यावसायिकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्नही प्रशासनाने संवेदनशीलतेने हाताळावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे विंचूरमधील प्रमुख रस्ते आणि फूटपाथ मोकळे झाले असले, तरी पुढील काळात पुन्हा अतिक्रमणे होऊ नयेत यासाठी प्रशासन काय उपाययोजना करते आणि प्रभावित व्यावसायिकांच्या पुनर्व्यवस्थेबाबत कोणती भूमिका घेते, याकडे विंचूरकरांचे लक्ष लागले आहे.

---

महाराष्ट्रभर विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे आवाहन; १२ जानेवारी २०२७ रोजी परीक्षा

# महात्मा फुले द्विशताब्दी गुणगौरव परीक्षा २०२६-२७ चे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे, ता २७ महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जन्मोत्सवानिमित्त राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने 'महात्मा फुले द्विशताब्दी गुणगौरव परीक्षा २०२६-२७' या राज्यव्यापी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संघटनेचे प्रदेश सरचिटणीस श्री संतोष भोजने यांनी दिली.महात्मा फुले यांचे जीवनकार्य, सामाजिक व शैक्षणिक योगदान, समता, सामाजिक न्याय, स्त्री-पुरुष समानता आणि जातिभेद निर्मूलनाच्या विचारांचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे दोन गट करण्यात आले आहेत. लहान गटात इयत्ता आठवीपर्यंतचे विद्यार्थी, तर मोठ्या गटात इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. परीक्षा मराठी माध्यमातून घेण्यात येणार असून प्रश्नपत्रिकेत बहुपर्यायी तसेच लघुत्तरी प्रश्नांचा समावेश असेल. एकूण ५० प्रश्नांसाठी १०० गुण असून परीक्षेचा कालावधी एक तास राहणार आहे.

लहान गटासाठी महात्मा फुले यांचे जीवनचरित्र हा अभ्यासक्रम असून, मोठ्या गटासाठी जीवनचरित्रासोबतच विविध क्षेत्रांतील कार्य आणि साहित्याचा अभ्यास करावा लागणार आहे. परीक्षार्थींना थर्ररीि पोस्ट, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संदर्भसाहित्य, सराव प्रश्न आणि अभ्यासक्रमानुसार मार्गदर्शक सामग्रीच्या माध्यमातून तयारी करून दिली जाणार आहे.

राज्यस्तरावर दोन्ही गटांसाठी प्रथम क्रमांकास ५ हजार रुपये व ट्रॉफी, द्वितीय क्रमांकास ३ हजार रुपये व ट्रॉफी आणि तृतीय क्रमांकास २ हजार रुपये व ट्रॉफी देण्यात येणार आहे. विजेत्यांना सन्मानपत्रही देण्यात येईल. तसेच महाराष्ट्र राज्यस्तरीय गुणवत्ता यादी प्रसिद्ध करून गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे.



प्रत्येक परीक्षा केंद्रावरील प्रत्येक गटातून प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सर्व परीक्षार्थींना सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे. मात्र पदकांसाठी संबंधित गटात केंद्रावर किमान ३० परीक्षार्थी असणे आवश्यक राहणार असून, त्यापेक्षा कमी संख्या असल्यास अंतिम निर्णय आयोजक समितीचा राहील.

ज्या परीक्षा केंद्रावर १०० किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी होतील, त्या केंद्राच्या केंद्रप्रमुखांचा 'शतकवीर केंद्रप्रमुख' म्हणून विशेष सन्मान करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावरही गुणवंत विद्यार्थ्यांचा निर्धारित निकषांनुसार गौरव करण्यात येणार आहे.

परीक्षेसाठी नोंदणीची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०२६ असून परीक्षा १२ जानेवारी २०२७ रोजी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीदिनी होणार आहे. परीक्षेचा निकाल ११ एप्रिल २०२७, महात्मा ज्योतिराव फुले जयंतीदिनी जाहीर करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्र सहभागी शाळेत अथवा संबंधित केंद्रसमन्वयकांच्या नियोजनानुसार निश्चित करण्यात येईल.

सर्व गटांसाठी परीक्षा शुल्क ५० रुपये ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा आणि विचारांचा अभ्यास करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या उपक्रमाचे आयोजन राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी राज्यध्यक्ष श्री अनिल नाचपल्ले (८४४६२२५७५७, ९५४५२२५७५७) तसेच प्रदेश सरचिटणीस श्री. संतोष भोजने (८२०८५१७१७२) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# हेरिटेज मणिधारी संस्थेच्या सभेत खेळीमेळीने सर्व विषय एकमताने मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहरातील मोठ्या गृहरचना संस्थांपैकी एक असलेल्या हेरिटेज मणिधारी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, सोलापूरची द्वितीय वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार,दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता जुना अक्कलकोट रोड येथील पुलगम बँक्वेट हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.या सभेत सर्व विषय एकमताने मंजूर झाले असून ,गेल्या वर्ष भरातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल अध्यक्ष व संचालक मंडळाचे सभासदांकडून अभिनंदन करण्यात आले व त्यांना पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

सर्व संचालकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन सभेस सुरुवात करण्यात आली सभेच्या प्रारंभी मृत सभासद व मान्यवरांच्या निधनाने शोक व्यक्त करुन सर्वांनी काही क्षण स्तब्धता पाळून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर संस्थेच्या अध्यक्षा अंजली माशाळकर यांनी प्रास्ताविक भाषणात सर्वांचे स्वागत करुन वर्षभरातील कार्याचा आढावा घेतला.संस्थेचे सचिव सिद्धेश्वर श्रीगादी यांनी सर्व विषयाचे वाचन केले.

त्यानंतर संस्थेच्या मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचन करून त्यास मान्यता देण्यात आली.सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवाल, ताळेबंद,नफा-तोटा पत्रक तसेच लेखापरीक्षण अहवाल याबाबत सभासदांसमोर माहिती ठेवून त्यावर चर्चा करण्यात आली.

सन २०२५-२६ मधील अंदाजपत्रकीय खर्चापेक्षा कमी-जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे,संस्थेच्या नफा वाटणीस मान्यता देणे तसेच आगामी आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकावर सभासदांनी चर्चा केली.यावेळी सन २०२६-२७ साठी सभासदांकडून आकारण्यात येणारे मेंटेनन्स व सेवा शुल्क, प्रति युनिट मेंटेनन्स, तसेच विविध प्रकारच्या युनिटनुसार सेवा शुल्क निश्चित करण्याबाबत चर्चा करण्यात आली. संस्थेच्या परिसरातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी उर्वरित परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे व त्यासाठीच्या इस्टिमेटला मंजुरी देण्याबाबतही विचारविनिमय झाला.

ज्या सभासदांनी आपल्या घरात भाडेकरू ठेवले आहेत,त्यांनी संबंधित भाडेकरूंचे पोलीस व्हेरिफिकेशन करून त्याची प्रत संस्थेच्या कार्यालयात जमा करावी,याबाबतही सभेत सूचना करण्यात आली.सोसायटी कार्यालयातील व्यवस्थापक व शिपाई यांच्या नियुक्तीस आणखी एक वर्ष मुदतवाढ देणे तसेच त्यांच्या वेतनवाढीबाबत विचार करण्यात आला.सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्याबाबतही चर्चा झाली.

दरम्यान,असोसिएशन अस्तित्वात असताना गृहरचना संस्थेची स्थापना का करण्यात आली, यासह अन्य मुद्द्यांबाबत काही प्लॉटधारकांनी उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर यांच्याकडे दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संस्थेकडून खुलासा मागविण्यात आल्याची माहिती सभेसमोर ठेवण्यात आली. या विषयावर सभासदांमध्ये सविस्तर चर्चा करून संस्थेच्या वतीने आवश्यक निर्णय घेण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला. संस्थेच्या विकासासाठी सभासदांनी मांडलेल्या सूचना,परिसरातील सुविधा,सुरक्षा, व्यवस्था,आर्थिक नियोजन आणि संस्थेच्या पुढील वाटचालीबाबत सकारात्मक चर्चा झाली. सभासदांच्या सहकार्याने संस्था अधिक सक्षम, सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीने पुढे नेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.विषयाच्या अनुषंगाने व सभासदांच्या प्रश्नांना ज्येष्ठ संचालक सुधाताई साळुंखे, अविनाश कटारे, अमोघसिद्ध साळुंखे, प्रा.नितीन पतंगे यांनी समर्पक व अभ्यासपूर्ण माहिती व उत्तरे दिली.सभेचे सूत्रसंचालन पत्रकार दशरथ वडतिले यांनी केले.माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे, प्रा.भीमाशंकर बिराजदार,गुरुशांत ढंगे व सचिन पतंगे यांनी विविध माहिती देत व प्रश्न विसरुन सभेचे कामकाज पुढे नेले.सभेला संस्थेचे कोषाध्यक्ष काशिनाथ बिराजदार,संचालक सर्वश्री सुरेश येळमेली,शंकर गाडी,बाहुबली वनकुद्रे विलास येमुल, राजकुमार कलशेट्टी,संगीता वडतीले,लक्ष्मी कोटे,स्मिता काळे, प्रेमा ढंगे,सुनीता गोडाळे व व्यवस्थापक दुर्गादास जिंदम आदी तसेच सभासद उपस्थित होते. अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीने आयत्यावेळी मांडण्यात येणाऱ्या विषयांवरही चर्चा करण्यात आली. सभेच्या शेवटी सौ.सुधा साळुंखे यांनी आभार प्रदर्शन केले.सभासदांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे द्वितीय वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाली.

---

# समता सभागृहात व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा व बौद्धदीक्षा कार्यक्रम उत्साहात संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी /बाळासाहेब अहिरे

दि बुद्धिस्ट ट्रेनिंग अँड कॉन्फरन्स सेंटरच्या वतीने समता सभागृहात व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा व बौद्धदीक्षा कार्यक्रमाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन आयु. राजेंद्र श्रीहरी मेहेरखांब सर, जिल्हा समन्वयक, आयु. महेंद्र विधाते सर आणि आयु. बाळासाहेब मोरे सर यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयु. राजेंद्र मेहेरखांब सर होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयु. सत्येंद्र तेलतुंबडे, मुख्य समन्वयक, तसेच आयु. डॉ. आर. डी. बडगे, ट्रस्टी, दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया यांनी मार्गदर्शन केले. व्यक्तिमत्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि धम्मविचार या विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी आयु. दयानंद घोडके, समन्वयक नाशिक जिल्हा, आयु. अरुण बल्लाळ, संचालक व कार्याध्यक्ष जेतवन धम्म संस्कार केंद्र, पैठण, आयु. भाऊसाहेब जगदाळे, संचालक नेवासा, तसेच गायकवाड मॅडम, संगमनेर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

राजेंद्र विधाते सर यांनी आंबेडकरी चळवळीबद्दल आपले विचार मांडले. सामाजिक परिवर्तन, विचारांची जपणूक आणि चळवळीतील कार्यकर्त्यांची भूमिका याबाबत त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

समर्थ सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात सविता विधाते, मेहेरखांब मॅडम, संगीता पारधे, महिरे सर, पंचशीला तेलतुंबडे, माया मोरे, राजेंद्र विधाते, सुगंधराव इंगळे, बौद्धाचार्य मस्के, कैलास लोखंडे आदींची उपस्थिती लक्षवेधी ठरली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला बोधीवृक्षाला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन, भोजन व्यवस्था, शिस्त आणि समयपालन यांचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयु. संदीप बाबुराव मेहेरखांब, आयु. बाबासाहेब जमधडे, आयु. बाळासाहेब चंद्रभान मेहेरखांब सर, आयु. वाल्मीक खंडीझोड सर, आयु. महादेव प्रधान सर, आयु. सुरेश रणदिवे सर, आयु. संगीता राजेंद्र मेहेरखांब, आयु. सविता महेंद्र विधाते आणि आयु. अश्विनी सागर जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. महेंद्र विधाते सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन विलास महिरे सर यांनी केले.

व्यक्तिमत्व विकासासोबतच धम्मविचार, सामाजिक परिवर्तन आणि आंबेडकरी चळवळीच्या विचारांची दिशा समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम उत्साहात व यशस्वीपणे संपन्न झाला.

---

काटगाव येथील सरपंच ग्रामसेवक व सदस्या अंतर्गत वादाची ठिणगी पडली; कोण वाली जनतेला

# सरपंच व ग्रामसेवकांच्या मनमानी कारभाराला कंटाळून काटगाव येथील आठ सदस्यांचा राजीनामा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग /दादासाहेब बनसोडे

मौजे काटगाव तालुका तुळजापूर येथील अनेक वर्षापासून ग्रामपंचायत आठ सदस्यांनी सरपंच अशोक माळी व ग्रामसेवक संजय घोगरे यांच्या संगन मताने गावातील कामे होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे ह्या आठ सदस्यांना कसलीही माहिती न देता मनमानी कारभार केला जात होता

ग्रामपंचायतच्या कामांमध्ये अनियमितपणा दाखवणे गाव विषय विकास कामांचा आराखडा तयार करणे , या संदर्भात माहिती न देणे गावाच्या विकासा संदर्भात कसल्या प्रकारची माहिती न देणे हा प्रकार जास्तीत जास्त होत होता ग्रामसेवकांच्या मदतीने हा कारभार चालत असल्याचे बोलले जात आहे

अनेक वर्षापासून हा मनमानी कारभार चालतच होता कोणीही ग्रामपंचायत स्तरावरती उठाव केलेला नाही परंतु तेथील ग्रामपंचायत सदस्य सूर्यकांत कांबळे यांनी अनेकदा या संदर्भात उठाव केलेला होता परंतु तेथील सरपंच आणि ग्रामसेवकांनी माहितीच्या अधिकारी खाली दिलेली माहिती माहिती देण्यास टाळाटाळ केली कोणत्याही विकास कामाला अडथळा केलेला नाही पण हे विकास कामे करत असताना ग्रामपंचायतीचे सदस्य यांना विश्वासात न घेता पूर्ण काम होणे गरजेचे आहे या सर्व त्रासाला कंटाळून काटगाव येथील लोकनियुक्त सदस्य १) प्रकाश अशोक पाटील २) अल्लाउद्दीन अहमद घाटवाले ३ ) मुकेश राम शिवशिंगवाले ४ )सूर्यकांत वसंत कांबळे ५ ) संगीता सतीश खोबरे ६ ) जगदेवी शिवाजी कोणाळे ७ ) अंजना सूर्यकांत झोकार व ८ ) कोमल योगेश धोते आधी जनांनी ग्रामपंचायतीच्या सरपंच आणि ग्रामसेवकांच्या मनमानी कारभाराला कंटाळून हा राजीनामा दिल्याचे बोलले जात आहे.



हा राजीनामा ग्रामपंचायतचे सरपंच अशोक माळी व ग्रामसेवक संजय घोगरे यांच्याकडे सादर केला आहे. या राजीनामामुळे तुळजापूर तालुक्यामध्ये एकच खळबळ उडालेले असून संबंधित ग्राम पंचायत सरपंच आणि ग्रामसेवक यांच्यावर काय कारवाई होणार याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

काडगावातील वार्डातील भोळ्या भाबड्या जनतेचं कोण ऐकणार कोण वाली असणार आहे याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

# सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यांत दुष्काळ, १०० टक्के क्षेत्राचे पंचनामे ८ दिवसांत पूर्ण करा : जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

## यंत्रणांनी टँकर मागणीच्या प्रस्तावाला ४८ तासांत मंजुरी द्यावी; प्रस्ताव टपालातून न देता तात्काळ उपलब्ध करून द्यावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : राज्य शासनाने खरीप हंगाम २०२६ मध्ये ट्रिगर-१ नुसार दुष्काळ जाहीर केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये हा निर्णय लागू झाला आहे. जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळण्यासाठी महसूल, ग्रामविकास व कृषी विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रत्येक शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन १०० टक्के शेती क्षेत्राच्या नुकसानीचे पंचनामे पुढील आठ दिवसांत पूर्ण करून अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात सन २०२६ खरीप हंगामातील ट्रिगर-१ दुष्काळाच्या अनुषंगाने विविध उपाययोजना करण्याबाबत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी,, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी (महसूल) लक्ष्मण कसेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) अंजली मरोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) सूर्यकांत भुजबळ, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख श्री. मगर, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. अनिल तांबे, विशाल येवले यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी व विभागप्रमुख उपस्थित होते. सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, भूमी अभिलेख तसेच जलसंधारण विभागाचे तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

**जिल्ह्यातील ९२ गावांत ८२ टँकर, ३३ विहिरी तर १३ बोअर अधिग्रहित करून पाणीपुरवठा सुरू**

जिल्हाधिकारी कार्तिकेयन म्हणाले की, जिल्ह्यातील ११ पैकी ११ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला असून, शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळण्यासाठी सरसकट पंचनामे करा. एकही शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्या. पंचनाम्याचा अहवाल आठ दिवसांत सादर करा. सद्यस्थितीत पंचनामे करताना १० टक्के नमुना पाहणी न करता प्रत्येक शेतात, प्रत्येक बांधावर जाऊन जे नुकसान दिसेल, ते सर्व पंचनाम्यात नोंदवावे. तसेच जिओ-टॅगिंगसह पंचनामे करावेत, असेही त्यांनी सूचित केले.

एसआयआरचे काम असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी एसआयआरचे काम दोन दिवस वगळता उर्वरित सर्व वेळ पंचनाम्याच्या कामालाच प्राधान्य द्यावे. सर्व तहसीलदारांनी ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी व कृषी सहाय्यक यांचे आदेश आजच काढावेत. सर्व गावांमध्ये पंचनामे पूर्ण गतीने सुरू करावेत. चुकीचे पंचनामे करू नयेत. दररोज सायंकाळी एकूण क्षेत्र व झालेले पंचनामे यांचा गोषवारा सादर करावा. तसेच सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि प्रांताधिकारी यांनी कोणत्याही परिस्थितीत टँकर मागणीचा प्रस्ताव आल्यास त्यास ४८ तासांत मंजुरी मिळेल, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

तसेच गावामध्ये टँकर प्रस्तावाला मंजुरी देताना रस्ते लहान असतील तर मोठ्या टँकरऐवजी छोटा टँकर देण्याबाबत विचार व्हावा. टँकर मागणीचे प्रस्ताव टपालामध्ये न देता संबंधित अधिकाऱ्याकडे तात्काळ उपलब्ध करून द्यावेत. गावामध्ये एकाच ठिकाणी टँकर उभा करून त्या ठिकाणाहून पाणी वितरण करावे. टँकरला जीपीएस बसविलेला असला पाहिजे. टँकरच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास २४ तासांच्या आत त्या गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू झाला पाहिजे, या दृष्टीने नियोजन करावे. सध्या १०० ते १२० दिवस पुरेल एवढा चारा उपलब्ध असला तरी पशुसंवर्धन विभागाने गावनिहाय व तालुकानिहाय चारा उपलब्धतेबाबत नियोजन करून दोन दिवसांत अहवाल सादर करावा. तसेच नियोजन समितीमधून चारा बियाणे खरेदीसाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला असून, आजच प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.



पुरवठा विभागाने अंत्योदय तसेच प्राधान्यक्रम योजनेचे कार्डधारक वगळून इतर रेशन कार्डधारकांची माहिती तयार करून त्याप्रमाणे धान्याची मागणी शासनाकडे नोंदवावी व त्याबाबतचा अहवाल एका आठवड्यात सादर करावा. उजनी धरणामध्ये ९२ टक्के पाणीसाठा आहे. परंतु लहान व मध्यम प्रकल्पांतील पाणीसाठ्याबाबत सूक्ष्म नियोजन करून त्याबाबतचा अहवाल सोमवारपर्यंत सादर करावा. नगरपालिका प्रशासन विभागाने जिल्ह्यातील सर्व नगरपालिका क्षेत्रांत उपलब्ध पाणी किती दिवस पुरेल व पुढे पाणीपुरवठ्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करावा, असेही जिल्हाधिकारी यांनी सूचित केले.

सर्व प्रांताधिकारी व तहसीलदार यांनी मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्त्यांची किमान २५० कामे प्रशासकीय मान्यता स्तरावर आणून ठेवावीत. तसेच व्हीजी रामजी योजनेअंतर्गत ९४१ ग्रामपंचायतींमध्ये ७२३ मंजूर कामांपैकी दुष्काळाच्या अनुषंगाने कामे तात्काळ सुरू करण्याबाबत ग्रामपंचायत विभागाने पुढाकार घ्यावा. ही कामे ३१ मार्च २०२७ पर्यंत सुरू राहतील, या दृष्टीने नवीन कामे प्रस्तावित करावीत. मृद व जलसंधारण विभागाने दुष्काळी गावांमध्ये जलसंधारणाची कामे मोघमपणे प्रस्तावित न करता काटेकोरपणे नियोजन करून निधी उपलब्धतेच्या अनुषंगाने कामे घ्यावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये दुष्काळी उपाययोजना राबविताना प्रत्येक विभागाने अत्यंत काटेकोरपणे नियोजन करून केलेल्या नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी सूचित केले.

प्रारंभी मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्ते, नरेगा, विविध जलाशयांची स्थिती, धान्य उपलब्धता, चारा, पंचनामे, टँकर मागणी प्रस्ताव आदी बाबींबाबत संबंधित विभागप्रमुखांनी बैठकीत माहिती सादर केली. सोलापूर जिल्ह्यात दि. २८-०९-२०२६ अखेर मंजूर टंचाई उपाययोजनांची तालुकानिहाय माहिती सोलापूर जिल्ह्यात सध्या एकूण ९२ गावांमध्ये टंचाई उपाययोजना मंजूर आहेत. तालुकानिहाय माहिती अशी : बार्शी तालुक्यात १२ गावांमध्ये २ टँकर मंजूर असून, ५ विहिरी व ५ बोअर अधिग्रहित करण्यात आले आहेत. करमाळा तालुक्यात ११ गावांमध्ये ८ टँकर, ८ विहिरी व २ बोअर मंजूर आहेत. मंगळवेढा तालुक्यात सर्वाधिक १६ गावांमध्ये १८ टँकर मंजूर असून, विहीर व बोअर अधिग्रहण नाही. मोहोळ व पंढरपूर तालुक्यांमध्ये सध्या एकही टँकर, विहीर किंवा बोअर मंजूर नाही. उत्तर सोलापूर तालुक्यात ५ गावांमध्ये ७ टँकर मंजूर आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यात १ गावासाठी १ टँकर मंजूर आहे. सांगोला तालुक्यात १९ गावांमध्ये सर्वाधिक २४ टँकर मंजूर असून, विहीर/बोअर अधिग्रहण नाही. माढा तालुक्यात १३ गावांमध्ये १३ टँकर, १० विहिरी व ३ बोअर मंजूर आहेत. अक्कलकोट तालुक्यात ८ गावांमध्ये २ टँकर, ३ विहिरी व ३ बोअर मंजूर आहेत. माळशिरस तालुक्यात ७ गावांमध्ये ७ टँकर व ७ विहिरी मंजूर असून, बोअर अधिग्रहण नाही.

# निफाड येथे आ.सत्यजित तांबे यांच्या वाढदिवसानिमित विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित तांबे यांचे वाढदिवस जयहिंद लोकचळवळ निफाड यांच्यावतीने साजरा करण्यात आला.असुन निफाड शहरातील आनंद विद्यार्थी वस्तीगृहातील गरजू विद्यार्थ्यांना यावेळी शैक्षणिक साहित्याची वाटप करण्यात आले .मानवाच्या उन्नतीचं महत्त्वाचं साधन हे शिक्षण आहे हा मंत्र सत्यजित नेहमी सांगत असतात हाच विचारांचा वारसा जपत जयहिंद लोकचळवळीच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयहिंद लोकचळवळीचे समन्वयक सचिन खडताळे यांनी केले सत्यजीत तांबे यांचे माध्यमातून अनेक शाळा, महाविद्यालयात कॉम्पुटर, शालेय साहित्य तसेच निफाड शहरासाठी युथ युनोवेशनच्या माध्यमातून ७५ लाखांची अभ्यासिका दिली आहे असे अनेक उपक्रम त्यांचे मार्गदर्शना खीली राबविले जातात असे खडताळे यांनी सांगितले आ.सत्यजित तांबे यांना शुभेच्छा दिल्या.

समन्वयक सुहास सुरळीकर यांनी विद्यार्थी, युवक, गरजूं साठी दादांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. शैक्षणिक साहित्याचे वाटप विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी का गरजेचे आहे, याविषयी मनोगत व्यक्त केले .तसेच सागर निकाळे यांनीही सत्यजीत तांबे यांचा कार्यकर्त्यांविषयी असेलेलं आपुलकी प्रेम, जिव्हाळा याविषयी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी जयहिंद लोकचळवळीचे., स्वप्नील बिनायकीया, अली भाई शेख, संपत कराड, गौरव व्यवहारे,सुरेश गोसावी, राहुल जमधडे, दुर्योधन गांगुर्डे, हर्षल जगताप, भगवान झोड. आदी उपस्थित होते ,वसतिगृहाचे अधीक्षक सुरेंद्र पगारे यांनी शुभेच्छा देऊन आभार मानले.

**निवासी शाळेने केले सादरीकरण : शौर्यदिन साजरा**

# विरांची शौर्यगाथा सादरीकरणाबद्दल जिल्हाधिकारी मंदार पत्की यांनी केले कौतुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री या विद्यार्थ्यांनी शौर्य दिनानिमित्त विरांची शौर्यगाथा नृत्य सादरीकरण करण्यात आले. याबद्दल गोंदिया जिल्ह्यातील जिल्हाधिकारी मंदार पत्की यांनी यावेळी उत्कृष्ट म्हणून चिमुकल्यांचे कौतुक केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात शौर्य दिनानिमित्त यावेळी जिल्हाधिकारी मंदार पत्की यांच्या अध्यक्षतेखाली अप्पर जिल्हाधिकारी अभिजित घोरपडे, उपजिल्हाधिकारी मानसी पाटील, जिल्हा माहिती अधिकारी अंजु निमस्कर संघटन संयोजक धनराज बावनथडे तसेच विरपत्नी,



विरमाता आदी उपस्थित होते.

या चमूमध्ये हितेश खंडारे, तन्मय सोनटापर प्रणव जनबंधू अरहंत लाडे धृप राऊत राजकुमार कोवे भार्गव सलकर कश्यप वालदे अंश बडोले श्रीस बंन्सोड, स्मित मेश्राम, कुलदीप मेश्राम यांच्यासह मार्गदर्शक शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी, निशा गभणे व दीक्षा तुरकर यांचा सहभाग होता. या कौतुकाबद्दल समाज कल्याण सहाय्यक आयुक्त किशोर भोयर, शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले, नीता भलमे पुष्करराज लांजेवार साधना पारधी आशिष शहारे प्रदीप ढवळे कार्तिक शहारे यांनी अभिनंदन केले. याप्रसंगी शहीद झालेले सैनिक यांच्या परिवाराचे स्वागत तसेच सन्मान करण्यात आले. जमिनीचे पट्टे वाटप करण्यात आले. संचालन व आभार जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी यांनी केले.

**भिवंडी, शहापूर, मुरबाड, कल्याण व अंबरनाथ तालुक्यांसाठी दुष्काळी मदतीची मागणी**

# ठाणे जिल्ह्यातही दुष्काळ जाहीर करावा : कपिल पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

ठाणे जिल्ह्यात यंदा पावसाने लवकर माघार घेतल्याने ग्रामीण भागातील शेतीसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असून, जिल्ह्यातील भिवंडी, शहापूर, मुरबाड, कल्याण आणि अंबरनाथ या पाच तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल मोरेश्वर पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



ठाणे जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात सुमारे ५४ हजार हेक्टर क्षेत्रावर भात व इतर पिकांची लागवड करण्यात आली आहे. यामध्ये सुमारे ५० टक्के क्षेत्रावर निमगर्वा, ४० टक्के क्षेत्रावर हळवा, तर उर्वरित क्षेत्रावर गवा भाताची लागवड करण्यात आली आहे. भातपिकाच्या वाढीसाठी साधारण १५ ऑक्टोबरपर्यंत पावसाची आवश्यकता असते. मात्र, पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने भातपिकाच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे.

भाताबरोबरच जिल्ह्यातील ग्रामीण भागात भाजीपाल्याची लागवडही मोठ्या प्रमाणावर केली जाते. पाण्याची उपलब्धता कमी झाल्याने भाजीपाला पिकांचेही नुकसान झाले आहे. त्यामुळे खरीप हंगामातील नुकसानीचा विचार करून शेतकऱ्यांना दुष्काळी सवलती व मदत देण्याची आवश्यकता असल्याचे कपिल पाटील यांनी पत्रात नमूद केले आहे.

पावसाने लवकर माघार घेतल्याचा परिणाम आगामी रब्बी हंगामावरही होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात यंदा ६ हजार २५० हेक्टर क्षेत्रावर रब्बी पिकांचे नियोजन करण्यात आले आहे. वाल, वाटाणा, हरभरा तसेच विविध गळीत धान्यांचे उत्पादन या भागात घेतले जाते. मात्र, जमिनीतील ओलावा आणि पाण्याची उपलब्धता कमी राहिल्यास रब्बी पिकांनाही फटका बसण्याची शक्यता आहे.

राज्य सरकारने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असताना ठाणे जिल्ह्यातील एकाही तालुक्याचा समावेश करण्यात आलेला नाही. ठाणे जिल्ह्याचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असले, तरी भिवंडी, शहापूर, मुरबाड, कल्याण आणि अंबरनाथ तालुक्यांच्या ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणावर शेती केली जाते. पावसाअभावी या भागातील शेतकऱ्यांनाही दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील पाचही तालुक्यांचा दुष्काळग्रस्त भागात समावेश करून शेतकऱ्यांना शासनाच्या दुष्काळी उपाययोजनांचा लाभ द्यावा, अशी मागणी कपिल पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीसंदर्भातील पत्राची प्रत राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनाही पाठविण्यात आली आहे.

# पुणे विभाग शिक्षक मतदार संघातून भाजपकडून डॉक्टर बी. पी. रोंगे यांची उमेदवारी; ६ ऑक्टोबरला अर्ज दाखल करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुणे विभागीय शिक्षक मतदार संघातून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संस्थापक सचिव डॉक्टर बी.पी .रोंगे यांनी भाजपकडून उमेदवारी मागितली आहे. ६ ऑक्टोंबर रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती त्यांनी दिली



उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील नामदेव वारी येथे प्रचाराचा शुभारंभ करणार असल्याची त्यांनी सांगितले शिक्षक मतदार संघाची निवडणूक २३ ऑक्टोंबर रोजी होणार असल्याचे पार्श्वभूमीवर डॉक्टर रोंगे यांनी प्रचाराची आणि मतदारसंघातील मोठे बांधण्याची तयारी केली आहे. मतदारसंघातील शिक्षकांची थेट संपर्क साधण्याची ती विविध तालुक्यातील दौरे करीत आहेत.

सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील दौरा त्यांनी सुरू केला असून शिक्षकांच्या भेटीसाठी जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेण्याच्या जात आहेत. शिक्षकांच्या प्रश्नाच्या आणि अडचणीचा शासन दरबारी पाठपुरावा करण्याचा प्रयत्न करणार असल्याची डॉक्टर रोंगे यांनी सांगितले.

पुणे विभागीय शिक्षक मतदार संघातील पुणे, सांगली, सातारा ,कोल्हापूर, आणि सोलापूर या पाच जिल्ह्याचा समावेश असल्याची त्यांनी सांगितले. मतदारसंघातील ८०० ऊन अधिक शाळातील शिक्षक मतदार निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणार असल्याची त्यांच्या माहितीतून समोर समोर आले आहे.

सहा ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दिवस आणि त्यानंतरचा नामदेव पायरी वरील प्रचार शुभारंभ व त्यांच्या निवडणूक प्रचारातील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.